**नियमीत दिवाणी दावा क्र. ५०/२०२५**
**मधील अर्ज निशाणी क्र.२९ खालील आदेश**
**(CNR- MHWS050002972025)**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ यांनी महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन–२०२५/प्र.क्र.४७/ज–१अ शासन परिपत्रकाची प्रत दाखल करण्याची परवानगी मिळण्यासाठी दिलेला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज वाचला. त्यास वादी यांच्या विधीज्ञांनी त्याच अर्जावर दिलेले लेखी म्हणणे विचारात घेतले. प्रतिवादी क्र. ४ यांच्यातर्फे विधीज्ञ श्री. एस.आर. जाखोटीया यांचा आणि वादी यांचेतर्फे विधीज्ञ श्री. एन.एम. मुळे यांचा युक्तीवाद ऐकला असता माझे विचारार्थ खालील मुद्दा निघाला.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. ४ दाखल करु इच्छित असलेली महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन–२०२५/प्र.क्र.४७/ज–१अ शासन परिपत्रकाची प्रत अभिलेखावर घेण्यास पात्र आहे काय? | ..होकारार्थी.. |
| २. | आदेश काय? | .. अंतीम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. ०१ बाबत :–**

३. प्रतिवादी क्र. ४ यांचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, या दाव्यात वादींनी प्रतिवादींच्या विरुध्द तात्पुरता मनाईचा अर्ज नि.क्र.५ दाखल केलेला आहे व तो अर्ज न्यायप्रविष्ट आहे. प्रतिवादी क्र. ४ हे त्या तात्पुरत्या मनाईच्या अर्जाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन–२०२५/प्र.क्र.४७/ज–१अ शासन परिपत्रक ची प्रत दाखल करु इच्छीत आहे. तरी, सदर प्रत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी.

४. याउलट वादी यांच्या विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, सदर चे

परिपत्रक हे या दाव्यास लागू होत नाही त्यामुळे प्रतिवादी  क्र. ४ यांचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५.	अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादी यांनी प्रस्तूतचा दावा जाहिर ठरावासाठी आणि कायम मनाई मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादींतर्फे तात्पुरता मनाई चा अर्ज निशाणी क्र. ५ दाखल केला आहे व तो न्यायप्रविष्ट आहे. प्रतिवादी क्र.४ हे महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन–२०२५/प्र.क्र.४७/ज–१अ शासन परिपत्रकाची प्रत दाखल करु  इच्छीत आहे. सदर प्रत अभिलेखावर आली तर वादींचा तात्पुरता मनाईचा अर्ज नि.क्र. ५ गुणदोषावर निकाली काढण्यास उपयुक्त होवू शकतो. त्यामुळे प्रतिवादी क्र.४ यांच्या विधीज्ञांचा उपरोक्त युक्तीवाद विचारात घेतला तर उपरोक्त दस्त अभिलेखावर घेण्यास पात्र आहे आणि प्रतिवादी क्र. ४  यांच्या विधीज्ञांच्या त्या उपरोक्त युक्तिवादात तथ्य दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देवून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१.	प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र. २९ मंजुर करण्यात येत आहे आणि प्रतिवादी क्र. ४  यांना उपरोक्त परिपत्रकाची प्रत दाखल करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

२.	खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by HAMBIRE DHANANJAY BHAGWANRAO
Date: 2025.06.17 16:18:40 +0530

स्थळ  : मंगरुळपीर	( ध. भ. हंबीरे )

दिनांक : १७.०६.२०२५.	दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,

मंगरुळपीर.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | C.R.Gadge |
| Name of Court | : | Shri. D. B. Hambire,<br>C.J.S.D.,Mangrulpir |
| Date of Decision | : | 17/6/2025 |
| Judgment signed by the P.O. on | : | 17/6/2025 |
| Judgment uploaded on | : | 17/6/2025 |